# वार्तापत्र

दिनांक २५.०८.२०१९

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोली

| **पो.स्टेशन/अप.क्र./कलम** | **घटनास्थळ/घटना ता.वेळ** | **फिर्यादी व आरोपीतांचे नाव** |
|---|---|---|
| गडचिरोली अप. क्र.४११/२०१९<br>कलम ६५(ई),८३ महा. दारुबंदि अधि. | मौजा कोटगल ७ किमी पश्चिम<br>**घटना ता. वेळ :-**<br>दिनांक २४.०८.२०१९ चे १३.३० ते १४.१५ वा.पर्यंत | सरकार तर्फे :- सफौ/दादाजी करकाडे नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली<br>पाहिजे आरोपीतांचे नाव :-<br>१. शेखर रामचंद्र शुंकरवार<br>२. प्रकाश रामचंद्र शुंकरवार दोन्ही रा. कोटगल ता. जि. गडचिरोली |

| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** |
|---|---|
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | सफौ/ दादाजी करकाडे, सफौ/पुरुषोत्तम वाटगुरे, पोहवा/भाऊराव बोरकर, पोहवा/नरेश सहारे, पोहवा/हेमंत गेडाम, पोशि/नुतेश धुर्वे, चापोहवा/रमेश मेश्राम स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली |

महाराष्ट्र शासनाने सन १९९२ पासुन गडचिरोली जिल्हा हा दारुबंदि जिल्हा म्हणुन घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हयातील काहि अवैध दारु विक्रेते हे शेजारील छत्तीसगड, मध्यप्रदेश तसेच सिमावर्ती गोंदिया, भंडारा, तसेच नागपुर जिल्हयातील अनुज्ञाप्तीधारक दारु विक्री दुकाणातुन दारुची खरेदी करुन चारचाकी तसेच दुचाकी वाहनाने आडमार्गाने बेकादेशिर वाहतुक करुन स्थानिक चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच दारुचा पुरवठा करीत असतात, अशा अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक २४.०८.२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथकास गोपनिय सुत्रांकडुन मिळालेल्या माहितीचे आधारे मा. श्री. डॉ मोहित कुमार गर्ग, अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) तसेच पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी यांना माहिती सांगुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील वर नमुद पोलीस पथक हे मौजा कोटगल येथील अवैध दारु विक्रेते शेखर रामचंद्र शुंकरवार , प्रकाश रामचंद्र शुंकरवार यांचे घराचे बाजुला काही अंतरावर सापळा रचुन पाळत ठेवली असता, नमुद इसम हे एका चारचाकी वाहनाने दारुची बेकायदेशिर वाहतुक करुन चारचाकी वाहनात ठेवुन असलेले दारुचे बॉक्स स्वत:चे घरी उतरवित असल्याचे निदर्शनास आल्याने सदरचे पोलीस पथक आपले अस्तीत्व लपवित नमुद इसमांचे घरी पोहचत असतांना पोलीस पथकाचा संशय आल्याने नुमद इसम हे दारुचे बॉक्स घटनास्थळी सोडुन दारुचे वाहतुकीकरीता वापरण्यात आलेल्या त्यांचे ताब्यातील चारचाकी वाहनासह घटनास्थळावरुन पळुन गेलेत.

पोलीस पथकाने घटनास्थळी अवैध दारु संबधात झडती घेतली असता, **एकुन ८०,०००/- रुपये किमंतीचा देशी दारु सुपर सॉनीक कंपनीचे एकुन १० सिलबंद बॉक्स प्रती बॉक्स १०० प्रमाणे एकुन १०००/- सिलबंद निपा** मिळुन आल्यात. घटनास्थळावरुन जप्ती केलेला मुद्देमाल ताब्यात घेवुन गुन्हयातील पाहिजे आरोपीतां विरुध्द पोलीस स्टेशन गडचिरोली येथे तक्रार दिल्याने पाहिजे आरोपीता विरुध्द पोलीस स्टेशन गडचिरोली येथे दिनांक २४.०८.२०१९ रोजी अपराध क्रमांक ४११/२०१९ कलम ६५ (ई),८३ महाराष्ट्र दारुबंदि अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकाचे प्रभावी कारवाई मुळे आगामी पोळा सनाचे निमीत्ताने अवैध दारु विक्रि करणारे तसेच बेकायेशिर रित्या दारुची वाहतुक करणा-या लोकांचे धाबे दणानले आहेत.